**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १४ क

## ''तुम्ही रंगीत काचांचा चष्मा वापरता''

मग मी म्हणालो, ''स्वामी, प्रत्येक व्यक्तिमत्त्वाची पातळी तुम्ही किती सुंदर रीतीने उंचीवर नेता, उदात्त करता, याचं मला आश्चर्य वाटतं. तुम्हीच फक्त ते करू शकता. दुसरं कुणीही नाही. तुम्हाला कुठलीच व्यक्तिरेखा हलक्या किंवा खालच्या प्रतीची दिसत नाही. तुम्ही त्यांना उंचीवर नेता. मी आश्चर्यचकित होतो.'' मी आनंदून म्हणालो.

तेव्हा बाबांनी उत्तर दिले: ''अनीलकुमार, माझ्यासाठी सगळेच चांगले असतात. सर्वजण मला चांगलेच दिसतात. माझ्या दृष्टिकोनातून त्यांच्यातला कोणीही वाईट नसतो. सगळे चांगलेच असतात. तुम्ही रंगीत चष्मे वापरत असल्यामुळे तुम्हाला काहीजण वाईट दिसतात. पण मला सर्वच चांगले वाटतात, कारण मी पूर्णपणे प्रेममय आहे. प्रेमामुळे तुम्हाला प्रत्येक गोष्ट चांगली आणि बरोबर वाटते. (तथापि भगवानांचे हे अटींचे कलम आहे.) तरीसुद्धा ती गंभीर वाटतो. मी त्रासलेला दिसतो, मी रागावलेला वाटतो, पण ते तू वाईट आहेस म्हणून नसतं, नाही! मला तुझ्यात सुधारणा करायची असते. जर तू नंतर वाईट झालास तर... (हशा) मला तू आदर्श असायला हवं आहे, तुला सुधारण्यासाठी, बिनचूक बनविण्यासाठी मी रागावल्याचे नाटक करतो. पण खरा मी रागावलेला नसतो.'' बाबा असं म्हणाले.

तेव्हा मी म्हणालो, ''स्वामी, तुम्ही दयाळू आहात. तुम्ही उदात्त आदर्शाचे, एकात्मतेचे, सहकार्याचे, प्रेमाचे आणि समजूतदारपणा, समंजसपणाचे चित्र उभे करून रामायणाबद्दल खूपसे सांगितले आहे. पण मला अशी शंका आहे की भारत देश खरोखरी तसा आहे का? महाभारत, हा एक वेगळाच ग्रंथ आहे. त्यात बंधुभावाबद्दल, आदर्शांबद्दल बोललं नाही, पण तुम्ही तर म्हणता की पूर्वीचे सगळे प्राचीन ग्रंथ आदर्शाने परिपूर्ण आहेत. मला काही समजत नाही. स्वामी कृपा करून स्पष्ट करून सांगा.''

## ''नेहमी दिसणाऱ्या शत्रूंविरूद्ध एकत्रित व्हा.''

नंतर स्वामींनी स्पष्टीकरण देताना अशी सुरूवात केली.

''तुम्ही चुकीचा विचार करत आहात. ते १०० भाऊ होते, ते कौरव. पांडव हे फक्त पाच भाऊ होते. सगळे मिळून १०५ भाऊ. तुम्ही म्हणत आहात की त्यांच्यामध्ये बंधुत्व नव्हते, त्यांच्यात प्रेम नव्हते. तुम्ही चुकत आहात.''

''का?''

''पांडवांचा सर्वात मोठा भाऊ धर्मराज, पिण्याच्या पाण्याच्या शोधात खूप दूर कुठेतरी गेला. तेव्हा त्याला पाण्याचे एक तळे दिसले होते. त्या तळ्यातून आपल्या भावांसाठी थोडे पाणी न्यायचे होते. तो पाण्याला स्पर्श करणार इतक्यात एक देवगंधर्व प्रकट झाला आणि म्हणाला, ''ह्या पाण्याला स्पर्श करू नकोस. तुला तसा अधिकार नाही.''

धर्मराज म्हणाला, ‘‘माझे भाऊ तहानेने मरणासन्न होत आहेत. कृपा करून पाणी हवं आहे.’’

तेव्हा देवगंधर्व म्हणाला, ‘‘जर तू माझ्या प्रश्नांची उत्तरे दिलीस, तर मी तुला पाणी नेण्याची परवानगी देईन आणि वरदानसुद्धा देईन.’’

धर्मराजाने सर्व प्रश्नांची उत्तरे समाधानकारक दिली. ते प्रश्न खूप चांगले आणि आश्चर्यजनक होते. ज्यांना ‘यक्षप्रश्न’ असे म्हटलं गेलं आहे. हे प्रश्न म्हणजे देवगंधर्व, यक्ष याने विचारलेले प्रश्न आहेत.

खोल तत्त्वज्ञानपूर्ण आणि तुम्हा सर्वांना खूप उत्सुकता असलेल्या यक्षप्रश्नांवर आपण एक स्वतंत्र सभा घेऊया. जर मी चुकत असेन, तर तुम्हा सर्वांच्या कुतुहलाबद्दल मला फार कौतुक वाटत आहे; कारण तुम्ही माझ्या बोलण्याला कंटाळलेले दिसत नाही. (हशा) माझ्या भाषणाला तुम्ही कंटाळलेले दिसत नाही. माझं भाषण एकतर्फी आहे असं तुम्हाला वाटत नाही.

मी मनापासून सांगतो की, माझ्या बोलण्याच्या सामर्थ्यापेक्षा भगवानांप्रती असलेली तुमची भक्ती तुमच्यामध्ये प्रतीत होत आहे! तुमच्यावर परमेश्वराचे असेच आशीर्वाद असोत!

आता हा देवगंधर्व ज्येष्ठ पांडव धर्मराजावर अतिशय खूश होऊन म्हणाला, ‘‘तुला काय हवे आहे? काय पाहिजे आहे?’’

‘‘धर्मराज म्हणाला, ‘‘मला माझे सर्व बंधू जिवंत करून हवे आहेत.’’ तुम्ही जाणताच की माझा प्रत्येक भाऊ तळ्याजवळ गेला आणि त्यांनी पाणी पिण्याचा प्रयत्न केला. पण कोणालाही यक्षाच्या प्रश्नांची उत्तरे देता आली नाहीत म्हणून त्यांना मरणाचा शाप दिला गेला होता.’’

‘‘त्यामुळे ते सर्व जण इथेच मरण पावले. फक्त धर्मराज वाचला आणि जेव्हा यक्षाने त्याला विचारले, ‘‘तुझी इच्छा काय आहे?’’ तेव्हा धर्मराजाने उत्तर दिले की माझे सर्व भाऊ जिवंत झाले पाहिजेत. माझ्या सर्व भावांना आयुष्य परत मिळावे.’’

आणि परिणामी सर्व १०४ भावंडं जिवंत झाली.

तेव्हा कुणीतरी विचारलं, ‘‘धर्मराजा, लक्षात घे, ते १०० कौरव तुझे शत्रू आहेत. तुम्ही पांडव असे फक्त पाचच आहात. त्या १०० कौरवांच्या पुनरुज्जीवनासाठी तू मागणी करावयास नकोस. ते तुमचे कट्टर शत्रू आहेत.’’

तेव्हा सर्वात ज्येष्ठ भाऊ धर्मराजाने स्पष्टीकरण देण्यास सुरुवात केली. आमच्यातील १०० जण एका पक्षाचे आहेत, आम्ही ५ जण दुसऱ्या पक्षात आहोत, पण जेव्हा आम्ही तिसऱ्या पक्षाला तोंड देऊ, तेव्हा आम्ही १०० नाही, तसेच पाचच नाही, तर आम्ही सर्व १०५ आहोत! जेव्हा आम्ही तिसऱ्याशी लढणार असतो तेव्हा आम्ही एकत्रित असतो.’’

किती सुंदर उदाहरण आहे. आजसुद्धा जर सगळी राष्ट्रे एकत्रित राहायला शिकली, सर्व एकत्रित उभे राहण्यास शिकले, तर हे जग म्हणजे स्वर्गच होईल. नि:संशयपणे एक मोठा स्वर्गच होईल.

अशा तऱ्हेने भगवानांनी स्पष्ट करून सांगितलं.

## ‘अधिक श्रेष्ठ कोण?’

मग, ‘‘स्वामी, मला महाभारतामध्ये दोन व्यक्तिमत्त्वं आढळली. एक म्हणजे विदुर आणि दुसरा म्हणजे संजय. या दोघात कोण महान् आहे? श्रेष्ठ आहे?’’

हा माझा प्रश्न आहे. दोघेही महान व्यक्ती आहेत. दोघेही उदात्त व्यक्तिमत्त्व आहेत. पण मला त्याच्यामध्ये दर्जा ठरवायचा आहे. जसं परीक्षेच्या निकालात पहिला वर्ग, दुसरा वर्ग असे असतात तसेच! (हशा)

पण आपल्या कनवाळू देवाने, त्याच्या अमर्याद प्रेमाने उत्तर दिलं, ''विदुर हा खरा हुशारच! त्याला जीवनातील नीतीशास्त्र आणि आचरण पद्धतीची पूर्ण माहिती होती. दुसरा संजय. तो नेहमी कृष्णाच्या सहवासात राहिला आणि प्रामाणिकपणे जीवन जगला. तो आध्यात्मिक जीवन जगला म्हणून संजय विदुरापेक्षा श्रेष्ठ ठरतो.'' असं ते म्हणाले.

''ओह्! असं आहे तर, स्वामी.''

''संजय हा कोण आहे? स्वामी, तुम्ही ज्याच्याविषयी बोलत आहात, तोच का? आम्हाला सर्वांना वाटतं की संजयपेक्षा विदुर श्रेष्ठ आहे.''

स्वामी म्हणाले, ''ज्याने भगवद्‌गीता ऐकली, तो संजय, (भगवत्‌गीता म्हणजे अर्जुन, एक पांडव आणि कृष्णामधील संवाद. कृष्ण म्हणजे अर्जुनाचा सारथी आणि परमेश्वरी अवतार.)

त्या संजयाने धृतराष्ट्राला (कौरवांचा पिता) सतत माहिती पुरवण्यास सुरूवात केली. (नोटः अर्जुन हा गोंधळलेला आणि निराश झालेला होता. तो रणक्षेत्रावर असताना समोर दिसणाऱ्या नातेवाईकांना, मित्रांना आणि पूज्य गुरूंना ठार मारण्याच्या बेतात होता. त्याने आपल्या भावना कृष्णार्पण केल्या. ज्ञान आणि अध्यात्मिक मार्गदर्शनासाठी स्वतःला कृष्णार्पण केले. तेव्हा कृष्णाने निराश झालेल्या अर्जुनाला सत्य काय ते शिकवलं. हा त्यांच्यातला संवाद- भगवद्‌गीता म्हणून अमर झाला- (देवाचं गीत.) टी.व्ही.वर ज्याप्रमाणे पाहावे तसं संजय हा रणक्षेत्राला पाहू शकत होता आणि तो जे जे पाहू शकत होता, ऐकू शकत होता त्याचा सर्व वृत्तांत धृतराष्ट्राला सांगत होता, म्हणून संजय हा विदुरापेक्षा नक्कीच श्रेष्ठ होता.''

## 'परमेश्वर जबाबदार नाही'

''स्वामी, तुमच्याकडून अशा सुंदर कथा ऐकल्यानंतर, माझा एक प्रश्न आहे, भगवान.''

''तुला नेहमीच प्रश्न पडतात. (हशा) हंऽऽ चल विचार. काय आहे तुझा प्रश्न?''

''स्वामी, प्रलय म्हणजे काय?''

''प्रलय म्हणजे विनाश. विनाश!''

''मग मानवतेचा विनाश हा माणसांच्या कर्मांमुळे होतो की देवाच्या इच्छेने होतो? तो कसा काय घडून येतो. मानवतेचा नाश कसा घडून येतो? माणसांच्या चुकीने की देवाच्या इच्छेने?''

परमेश्वर कधीही त्याची चूक मान्य करणार नाही. तो नेहमीप्रमाणे स्वतःचेच म्हणणे उचलून धरेल. (हशा)

मग त्यांनी माझ्याकडे दृष्टिक्षेप टाकून ते म्हणाले, ''विनाश ही माणसाचीच चूक आहे. त्याला परमेश्वर जबाबदार नाही.''

''ओह्! आलं लक्षात.'' (हशा)

''मग देवाची भूमिका काय असते?''

''परमेश्वर साक्षीभूत आहे. (हशा) एवढंच! तो जबाबदार नाही.''

''स्वामी, मग आपण जबाबदार कसं?''

''तुमचा स्वार्थीपणा, अधाशीपणा, द्वेषवृत्ती, हावरेपणा, राग, क्रोध - अशी तुमची सगळी न्यूनता विनाशाच्या मार्गाकडे नेते. परमेश्वर कारणभूत नसतो कारण त्याचं दुसरं नाव म्हणजे प्रेम आहे.'' भगवानांनी असं सांगितलं.

त्यांनी गुजराथ राज्यात झालेल्या भूकंपाविषयी उल्लेख केला. तुम्ही त्याविषयी ऐकलंच असेल. स्वामी म्हणाले, ''तिथे हजारोंनी लोकांची जिवीतहानी झाली.तो एक प्रकारचा विनाशच होता.'' भगवानांनी हेच

सांगितलं. ''आणि आज, स्वार्थीपणाने, आधुनिकतेने जगणारे जग इतके विकृत, अनैतिक बनलं आहे, जे विनाश किंवा प्रलयाला जबाबदार आहे.''

''स्वामी, त्याला आपण जबाबदार नाही. (हशा) हे परिणाम कलीयुगाचे आहेत. (हशा) कली म्हणजे काळ किंवा दुष्ट! प्रभाव म्हणजे परिणाम! म्हणजे मी वाईट असणं हा कलीयुगाचा परिणाम आहे. मला त्याबद्दल दोष दिला जाऊ नये. स्वामी, असं हे कलियुग आहे. अपण काय करू शकतो?'' (हशा)

भगवान ताबडतोब म्हणाले, ''अरे, तू असं का बोलतो आहेस? हा परिणाम नाही आहे. तुम्ही तुमचा स्वभाव, वृत्ती, परिणामांच्या दबावाखाली बदलू नये. त्या परिणामांचा तुमच्यावर प्रभाव पडू नये. तुम्ही तुमचा स्वभाव बदलून त्या परिणामांची शिकार बनू नये.'' असं भगवान म्हणाले.

माझ्या मित्रांनो, मला हाच विचार तुम्हाला स्पष्ट करून सांगायचा आहे. स्वभाव हा नैसर्गिक असतो, प्रभाव हा परिणाम करणारा असतो. माझ्यावर होणाऱ्या आधुनिक संस्कृतीमुळे, आधुनिक वागणुकीमुळे माझा स्वभाव बदलू नये. ते फक्त बाह्य प्रभाव असतात, परिणाम असतात, पण माझे मीपण, जन्मजात असते. तोच स्वभाव असतो. माझा स्वत:चा स्वभाव.

बाबा म्हणाले, ''तुमचा स्वभाव कधीही आजूबाजूच्या वातावरणाप्रमाणे बदलू नका.''

मी कोणाला तरी सिगारेट ओढताना पाहतो. तो परिणाम असतो. म्हणून मला वाटतं, आपणही सिगारेट ओढावी. ह्याचा अर्थ असा की मी माझे अंतर्गत स्वभाव बदलतो, पण ते चुकीचे आहे. अशा कितीतरी मोठ्या प्रभावी गोष्टी समोर आल्या तरी आपण स्वत:ला बदलायचे नसते. अशी ही ती शिकवणूक!

***